संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# पुन्हा एकदा भारतविरुध्द इंडिया......

सोन्याचा धूर ज्या देशामध्ये निघत होता त्याठिकाणी आज गरिबीचा महापूर दाटलेला आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच देशाच्या गरिबीची मोजदाद केली गेली. जातीनिहाय सर्व्हेक्षण करताना कोणत्या जातीचे किती लोक आहेत. यापेक्षाही देशात आता दोन महत्त्वाच्या जाती ठळकपणे पुढे आल्या किंवा तोच सर्वात मोठा जातीभेद असल्याचे केंद्र सरकारच्या ताज्या सर्व्हेक्षणातून समोर आले. या दोन जाती म्हणजेच गरीब आणि श्रीमंत! यावेळी प्रथमच सरकारने देशाच्या गावागावात घराघरात जाऊन प्रत्येकाचे उत्पन्न किती आहे याचा आढावा घेतला. त्यामधून जी आकडेवारी बाहेर आली आहे, ती म्हणजे देशात गरिबीचा महास्फोट झाल्याचे सांगणारी ठरते. तब्बल ४८ टक्के जनता ही दारिद्र्यरेषेखाली असल्याचे या अहवालातून स्पष्ट होते, आतापर्यंतच्या सरकारच्या सर्व्हेक्षणांमध्ये किंवा अन्य अर्थज्ज्ञांच्या माहितीनुसार देशातील दारिद्र्याचे प्रमाण हे २८ ते ३५ टक्के असल्याचे सांगितले जात होते, परंतु आता अधिक भेदक सत्य या अहवालातून समोर आले आणि देशातील गरिबीचे प्रमाण ४८ टक्के असल्याचे स्पष्ट झाले आहे.

गरीब आणि श्रीमंतीमधली ही दरी कमी होण्याऐवजी वाढत असल्याचे स्पष्ट दिसते. स्वातंत्र्याच्या पासष्ट वर्षांनंतरही या देशातल्या आणि प्रामुख्याने खेड्यामध्ये राहणाऱ्या सामान्य माणसाला आपले जीवन जगण्यासाठी रोज तीस रुपयेसुध्दा मिळत नसतील तर, आपल्याला देशाच्या स्वातंत्र्याची साठ वर्षे साजरी करण्याचाही नैतिक अधिकार पोहचत नाही. नुसते स्वातंत्र्य मिळून उपयोगाचे नाही, जोपर्यंत देशातील सामान्य माणसाला जगण्याचे अधिकार मिळत नाहीत, तोपर्यंत त्या स्वातंत्र्याला अर्थ नाही. इतक्या मोठ्या प्रमाणावर देशातील दारिद्र्य जर टिकून राहात असेल तर, एकूणच आपल्या देशाच्या नियोजनामध्ये राज्यकारभारामध्ये मोठा दोष असल्याचे मान्य करावे लागेल. अर्थातच तो दोष म्हणजे लोकशाही व्यवस्थेने राज्यकारभाराची जबाबदारी ज्या सत्ताधाऱ्यांवर किंवा राजकारण्यांवर सोपवलेली असते, त्यांनी या मूलभूत गोष्टींकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे सिध्द होते. ज्या देशातील साठ टक्के जनता खेड्यामध्ये राहते. त्याकडेच दुर्लक्ष केले गेले आणि विकासाचे बुजगावणे उभे करून प्रगतीचे तोरण बांधल्याचा बेगडी आनंद निर्माण केला गेला. त्याची फळे म्हणजे हे गरिबीचे भेदक वास्तव आहे.

## पंधरा कोटीचा पगार साठ कोटी बेकार

मोठमोठ्या अर्थशास्त्रीय गप्पा मारण्यात काही अर्थ नाही. आकडेवारीचे भेंडोळे फेकून दिशाभूल केली जाते. किंबहुना तथाकथिक अर्थशास्त्राचे आणि नियोजनाचे झेंडे मिरवून श्रीमंतांच्याच पालख्या वाहिल्या जातात, हे वास्तव यानिमित्ताने पुन्हा एकदा समोर आले. अगदी छोट्याछोट्या उदाहरणांमधून गरीब श्रीमंतामधली दरी स्पष्ट होते. परंतु अनेकांना ही उदाहरणे पटत नाहीत. कारण त्यांचा एकूणच विकासाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा परकीय अर्थशास्त्रीय सिध्दांतावर बांडगुळासारखा वाढलेला असतो. देशातील मोठमोठ्या उद्योगपतींचे पगाराचे आकडे अलीकडेच प्रकाशित झाले. त्यामध्ये मुकेश अंबानींचा पगार महिन्याला पंधरा कोटी आहे. काही लाख कोटींचा व्यवसाय सांभाळणाऱ्या मुकेश अंबानींचा पगार १५ कोटी असणे यात अनेकांना काही गैर वाटू शकत नाही. परंतु हा सगळा लाख कोटींचा व्यवसाय ज्यांच्या जीवावर उभा राहतो त्या देशातील पन्नास टक्के जनतेला तीस रुपयेसुध्दा रोज मिळत नाही. तेव्हा आपल्या श्रीमंतीला सरकारी धोरणांमधून कसे पोसत आहोत हे सिध्द होते.

अंबानींसारखी अशी हजारो उदाहरणे आपल्या देशात आहेत. ज्यांच्याकडे पैशाचा एकतर्फी ओघ सुरू राहतो. याचेच समर्थन करणारे उदाहरणच द्यायचे झाले तर, आणखी असे सांगता येईल की, आपल्या देशातील राष्ट्रीयकृत बँकांनी अगदी गेल्या महिन्यातल्या आकडेवारीप्रमाणे ६३ लाख कोटींची कर्जे दिली आहेत. त्यापैकी चौदा लाख कोटी रुपयांची कर्जे बुडीत खात्यात गेल्याचे समोर आले आहे. देशातील शंभर बड्या श्रीमंतांनी तुमच्या आमच्यासारख्या सामान्य माणसाचे कररूपाने गोळा होणारे किंवा बँकांमध्ये जमा होणारे पैसे अशा बेमालूम पध्दतीने लंपास केले आहे. चौदा लाख कोटी रुपये परस्पर हडप केले जातात. दिलेली कर्जे परत न करता ही कर्जे मूठभर श्रीमंतांची तिजोरी भरत राहतात आणि त्या लोकांविरुध्द सरकार काहीही करू शकत नाही. गरिबाला मात्र साधी रिक्षा घेण्यासाठीसुध्दा कर्जे मिळू शकत नाही. त्याचे चार हप्ते फेडले नाहीत तर रिक्षा परवाना जप्त करण्याच्या नोटिसा निघतात. हीच ती गरीब आणि श्रीमंतीमधली भेदक परिस्थिती आहे. देशातील ४८ टक्के जनता गरीब का राहते याचे उत्तर या उदाहरणांमध्ये दडले आहे.

## अन्यथा यादवी

स्वातंत्र्यानंतरचे हे पहिले सर्व्हेक्षण आणि त्यामधून बाहेर आलेली ही धक्कादायक आकडेवारी कोणत्याही संवेदनशील माणसाची झोप उडवणारी ठरते. एकीकडे डिजिटल इंडियाचे दणदणीत उद्घाटन होते आणि त्याचवेळी सरकारच्याच अहवालातून इंडियाचे फिजीकल स्वरुप ढळढळीतपणे समोर येते. ज्याची आवश्यकता होती त्याकडे दुर्लक्ष झाले. झोपड्यांमध्ये रंगीत टिव्ही पोहचले. पण महिन्याचे उत्पन्न वाढले नाही. पायात चप्पल नसताना मोबाईल हातात दिले गेले. कारण गावाकडच्या कोणत्याच रस्त्याला महत्त्व मिळाले नाही. ना शिक्षण ना रोजगार अशा दोन्ही बाजूंनी भारताच्या ग्रामीण भागाची कोंडी होत गेली. आणि या कोंडीतूनच याच ग्रामीण भागातले दहा हजार शेतकरी दरवर्षी आत्महत्या करीत असतात.

महात्मा गांधींनी खेड्याकडे चला असा संदेश दिला. मोदींनी स्मार्ट सिटीचा बोलबाला केला आहे. स्मार्ट खेडी तयार करण्याकडे कधीच लक्ष दिले गेले नाही आणि म्हणूनच आज पुन्हा इंडिया विरुध्द भारत हे चित्र अधिक गडद होऊन पुढे आले आहे. विकासाचे मूलभूत सिध्दांत मोठ्या प्रमाणावर चुकले. खेड्यातल्या शेवटच्या माणसापर्यंत जाण्याचा मार्गच शोधला गेला नाही, पण जगाबरोबर जाण्याकरता ई हायवे किंवा इलेक्ट्रॉनिक हायवेचा आग्रह धरला जात आहे. निदान आतातरी इलेक्ट्रॉनिक हायवेबरोबर रुरल हायवेचा विचार होणार आहे का, तो समतोल साधला जाणार आहे का अन्यथा भारताची ही गरिबी भविष्यात एका यादवीला जन्म देणारी ठरू शकते.